## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. १३ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत पंडित दीनदयाळ उपाध्याय अध्यासनातर्फे "एकात्म मानव दर्शन – संकल्पना आणि प्रासंगिकता" या विषयावर एक दिवशीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि. १५ ऑक्टोबर रोजी विद्यापीठात करण्यात आले आहे.

ही परिषद पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येत असून त्यांच्या विचारांचा सखोल अभ्यास, प्रसार आणि आधुनिक काळातील प्रासंगिकता अधोरेखित करणे हा यामागचा प्रमुख उद्देश आहे. या राष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवनदृष्टीतील एकात्मता, मानवतेचा केंद्रबिंदू असलेला विकास मॉडेल, तसेच समाजातील वंचित घटकांचा विकास या विषयांवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांपर्यंत आणि संशोधकांपर्यंत त्यांच्या विचारांची पोहोच घडविणे, तसेच त्यातून प्रेरणा घेऊन समाजउभारणीस हातभार लावणे, हा परिषदेचा प्रमुख हेतू आहे.

या राष्ट्रीय परिषदेचे बीजभाषण धुळे येथील श्री. प्रकाश पाठक करणार असून, अंबाजोगाई येथील डॉ. वसंत देशमुख यांचे "आर्थिक विकासात वंचितांचा सहभाग – एकात्म मानव दर्शन आणि अंत्योदय", यवतमाळ येथील डॉ. नितीन खर्चे यांचे "एकात्म मानव दर्शन : पंच परिवर्तन"तर मुंबई येथील डॉ. रविकांत सांगुर्डे यांचे "एकात्म मानव दर्शन - उपयोगिता" या विषयांवर विशेष व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे.

परिषदेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय अध्यासन, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे प्रा. पी.पी. माहुलीकर (अध्यासन प्राध्यापक), प्रा. जगदीश पाटील (अधिष्ठाता मानव विज्ञान विद्याशाखा) व प्रा. पवित्रा पाटील (व्य.प. सदस्य) यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

**बातमी क्र. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. १३ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे पेट २०२४ मधील मानवविज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन व आंतरविद्याशाखीय अभ्यासविद्या शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्री - पीएच.डी. कोर्सवर्कचा प्रारंभ आज दि. १३ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.०० वाजता प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी एकूण ९१% संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य जगदीश पाटील, कोर्सवर्क अध्यक्ष व अधिष्ठाता डॉ. अनिल डोंगरे, प्रा. आशुतोष पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्र-कुलगुरू यांनी विद्यार्थ्यांना संशोधनविषयांची निवड करतेवेळी समाजाभिमुख व समाजासाठी उपयुक्त ठरणारे संशोधन करावे. समस्या शोधून त्यावर नवनवीन शोध यासंदर्भात आवश्यक असणारे विषय निवडावेत आपल्या संशोधनाचे पेंटट होईल असे दर्जेदार समाजपयोगी संशोधन करावे असे आवाहन केले. या प्रसंगी प्राचार्य जगदीश पाटील व प्रा. अनिल डोंगरे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन संशोधन विभागाचे सहा. कुलसचिव (अ.का.) प्रवीण चंदनकर यांनी केले. या कोर्सवर्क करीता प्रा. प्रशांत सोनवणे, डॉ. प्रिती सोनी व प्रा. अभय मनसरे हे समन्वयक म्हणून कार्य करीत आहेत. आजच्या पहिल्या दिवशी आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतील १००% विद्यार्थी, मानवविज्ञान विद्या शाखेतील ९०% तर वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील ९२%विद्यार्थी उपस्थित होते. या तीनही शाखेतील एकूण २७३ पैकी २४९ संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. हा कोर्सवर्क व्यवस्थापनशास्त्र प्रशाळा, सामाजिकशास्त्र प्रशाळा व अधिसभा सभागृह येथे दि. १५ ऑक्टोबर पर्यंत आयोजित करण्यात आला आहे.

सकाळ सत्रात प्राचार्य जगदीश पाटील, प्रा. आशुतोष पाटील, प्रा. मनिषा इंदाणी, प्रा. रमेश सरदार व प्रा. आर.एस. तलवारे यांचे तर दुपार सत्रात प्रा. धीरज चव्हाण, प्रा. मधुलिका सोनवणे व प्रा.एस.टी. भुकन यांनी मार्गदर्शन केले. संशोधन विभागातील कर्मचारी संजय ठाकरे, सुनील अढाव, ललित काटकर, यशवंत शिसोदे, श्रावण पाटील, मनोहर पाटील, शुभम धुमाळ, नरेंद्र तायडे, पियुष भावसार यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परीश्रम घेतले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ३ ऑक्टोबर, २०२५

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता